पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, प्रशासन विभाग,
क्र.प्रशा/१/कावि/ ३६० /२०२०
दिनांक:- १६ /०३/२०२०

**विषय :- कोरोना विषाणु संसर्गाचा प्रादुर्भाव रोखणे तसेच कोरोना विषाणु रोगाचा प्रसार टाळण्यासाठी मनपा मुख्य कार्यालयात नागरिकांना प्रवेश बंद करण्याबाबत.**

**आदेश,**

मा.मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०५/०३/२०२० रोजी कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाययोजना संबंधी निर्देश दिलेले आहेत. तसेच यात्रा समारंभ,उत्सव इत्यादीसाठी मोठे जनसमुदाय एकत्रित असणा-या कार्यक्रमास प्रतिबंध करणे किंवा यासारखे कार्यक्रम आयोजित करण्यापासून परावृत्त करणे संबंधीचे आदेश दिलेले आहेत. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करणेसाठी मा.विभागीय आयुक्त,पुणे यांनी परिपत्रक क्रमांक नपा/६/कावि/ १००/२०२० दिनांक ०९/०३/२०२० अन्वये कळविले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु संसर्गाचा धोका निर्माण झाला असून सदर आजाराचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणे आवश्यक आहे. कोरोना विषाणु उपाययोजना संबंधी दिलेल्या वरीलप्रमाणे निर्देशा नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य कार्यालयामध्ये दैनंदिन व वैयक्तिक कामासाठी नागरिक तसेच अन्य सेवाभावी संस्थांचे समाजसेवक, ठेकेदार व ठेकेदारांचे कर्मचारी यांची मुख्य कार्यालयात मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे त्यांना दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत मनपा मुख्य कार्यालयात प्रवेश बंद करणे आवश्यक आहे. काही अपवादात्मक परिस्थितीत अथवा कामकाजाचे आवश्यकतेनुसार नागरीकांना मुख्य कार्यालयात येणे आवश्यक असल्यास **सुरक्षा विभागास खालीलप्रमाणे निर्देश देणेत येत आहेत.**

१.ज्या विभागाशी संबंधित कामकाज असेल त्या विभागाचे संबंधित विभागप्रमुखांनी त्यांची स्वाक्षरी असलेली लेखी परवानगी/पास संबंधित अभ्यागताचे नावासह दिल्यानंतरच विशेष बाब म्हणून प्रवेश द्यावा.

२.प्रवेश द्यावयाचे नागरिकांनी मास्क परिधान केलेला असणे आवश्यक आहे.

३.प्रवेश केल्यानंतर मुख्यालयामधील स्वच्छतागृहामध्ये जाऊन सॅनिटायझरचा वापर करावा अथवा साबनाने / हँड वॉशने स्वच्छ हात धुऊन नंतरच कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडे जाणेबाबत सुरक्षा कर्मचारी यांनी समक्ष सुचना द्याव्यात.तसेच कामकाज पूर्ण झालेनंतर लगेच कार्यालय सोडणेबाबत सूचना द्याव्यात. नागरीक अथवा इतर व्यक्ती जास्त वेळ विभागात रेंगाळणार नाही याची दक्षता बोलविणा-या संबंधित अधिका-याने घ्यावयाची आहे.

४.मनपा गेट पासशिवाय कार्यालयामध्ये आढळणा-या अथवा विभागप्रमुखांनी लेखी परवानगी दिलेल्या नागरीकांशिवाय इतरांना सुरक्षा विभागाने मनपा मुख्य कार्यालयात प्रवेश देवू नये. सुरक्षा विभागाने यासाठी प्रत्येक मजल्यावर ०१ रखवालदार कर्मचारी नेमूण त्यांचेमार्फत कार्यवाही करावी.

५.मनपाचे अन्य क्षेत्रीय/विभागीय कार्यालयातील व मुख्य कार्यालयाबाहेरील सर्व विभागातील पाठवावयाचे अत्यंत तातडीचे टपाल हे फक्त संबंधित विभागाचे ई-मेलद्वारे पाठविण्यात यावे. मुख्य कार्यालयाबाहेरील मनपा कर्मचा-यांनी अनावश्यक कामकाजाकरीता मुख्य कार्यालयात येवू नये. यावयाचे असल्यास विभागप्रमुखांचे पूर्व परवानगीने यावे.

६.मनपा मुख्य कार्यालयामध्ये बैठक व्यवस्था असलेल्या अधिका-यांनी त्यांचे नियंत्रणाखाली असलेल्या उपविभागामधील अधिकारी/कर्मचा-यांना अनावश्यक कामकाजाकरीता मुख्य कार्यालयात बोलावण्यात येवू नये.

सदर आदेशाची सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी तात्काळ काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**(श्रावण हर्डीकर)**
**आयुक्त,**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

**प्रति - सर्व संबंधित विभागप्रमुख**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**